## नि.दि.दा.क्र.६१/२०२२, अर्ज निशाणी ९५ खालील आदेश

(CNR MHSI080004222022)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.०१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द करुन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत प्रतिवादी यांनी हजर राहून आपली कैफियत मुदतीत दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द विना कैफियत चालवण्याबाबत आदेश केला आहे. प्रतिवादी ही उच्च रक्तदाब व जुनाट सांधेदुखी या आजाराने त्रस्त आहे. प्रतिवादी कायमस्वरुपी पुणे येथे वास्तव्यास असते. आजारपणामुळे प्रतिवादीस लांबचा प्रवास करता येत नाही. त्यामुळे, प्रतिवादी हिस गावी येऊन मिळकतीचे कागदपत्र जमा करुन वकिलांना देऊन मुदतीत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास हेतुपुरस्कर टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादीस या दाव्याच्या कामी आपली बाजू मांडून कैफियत द्यावयाची आहे. त्याकरीता प्रतिवादीविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब, त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०२. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्जातील कारणे खोटी आहेत. कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा अंतिमतः

निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यामुळे, न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सर्व निर्णायक वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यामुळे, अर्जदार/प्रतिवादीस त्यांचे कथन अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी/अर्जदार यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून वादीला खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

:: **आदेश** ::

१. निशाणी क्र.९५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.५००/-(रूपये पाचशे फक्त) वादीस द्यावेत.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2026.03.11 17:32:10 +0530

स्थळ : कणकवली (शुभम जी. लटुरिया)

दिनांक :११/०३/२०२६ न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी